


दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे | अंक : ३८६ वा | दि ०९ जून २०२६ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# काँग्रेसमुक्त गुजरात! स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच नामुष्की मोदींच्या होमपीचवर काँग्रेसला भोपळा...

**वृत्तसंस्था गांधीनगर**

गुजरातच्या चार राज्यसभेच्या जागांसाठी भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. विरोधकांकडून एकही उमेदवारी अर्ज भरण्यात आलेला नाही. त्यामुळे भाजपचे चारही उमेदवार बिनविरोध विजयी होतील. त्याबद्दलची औपचारिक घोषणा शिल्लक आहे. हा क्षण भाजपसाठी ऐतिहासिक मानला जात आहे. गुजरात राज्याच्या स्थापनेनंतर पहिल्यांदाच गुजरातमधून राज्यसभेवर काँग्रेसचा एकही खासदार जाणार नाही. त्यामुळे राज्यसभेच्या पातळीवर काँग्रेसमुक्त गुजरात झाल्याचा दावा भाजपचे प्रदेशाध्यक्ष जगदीश विश्वकर्मा यांनी केला. तर यावरुन काँग्रेसनं तिखट प्रतिक्रिया दिली आहे. हा भाजपचा अहंकार असल्याचं प्रत्युत्तर काँग्रेसचे प्रवक्ते मनीष दोशी यांनी दिलं आहे. गुजरातमधून काँग्रेसकडून केवळ शक्तिसिंह गोहिल राज्यसभेवर आहेत. त्यांचा कार्यकाळ संपत आलेला आहे. राज्याच्या विधानसभेत एकूण १८२ आमदार आहेत. काँग्रेसकडे केवळ १२ आमदार आहेत. २०२२ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीनंतर काँग्रेसनं विधानसभेतील विरोधी पक्षनेतेपद गमावलं. यानंतर आता काँग्रेसवर आणखी मोठी नामुष्की ओढावली आहे. गुजरात राज्याच्या स्थापनेनंतर अशी स्थिती पहिल्यांदाच निर्माण झालेली आहे. २०१४ मध्ये लोकसभा निवडणुकीच्या प्रचारावेळी भाजपनं नरेंद्र मोदी यांना पंतप्रधान पदाचे उमेदवार जाहीर केलं. तेव्हा त्यांनी काँग्रेस मुक्त भारताची घोषणा दिली होती. काँग्रेसला राजकीयदृष्ट्या संपवणं हा उद्देश नसून देशातून काँग्रेस संस्कृती (भ्रष्टाचार, घराणेशाही आणि मतपेटीचं राजकारण) संपवणं हा आपला हेतू असल्याचं त्यांनी म्हटलं होतं. महात्मा गांधी, सरदार पटेल यांच्यासारख्या दिग्गजांच्या जन्मभूमीत काँग्रेस सातत्यानं कमकुवत झाली आहे. गुजरातमधून राज्यसभेवर ११ जण जातात. पहिल्यांदाच या सर्वच्या सर्व ११ जागांवर भाजपचे सदस्य असतील. स्वातंत्र्यानंतर काँग्रेस पहिल्यांदाच शून्यावर आली आहे. गुजरातमध्ये लोकसभेच्या



२५ जागा आहेत. पैकी २४ जागांवर भाजपचे खासदार आहेत. काँग्रेसला केवळ १ जागा मिळालेली आहे. गेनीबेन ठाकोर गुजरातमधील काँग्रेसच्या एकमेव खासदार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहांच्या होमपीचवर भाजपनं काँग्रेसला चीतपट केलं आहे. राज्याच्या राजकारणात हा क्षण ऐतिहासिक मानला जात आहे.

# राज्यातील निर्णय प्रक्रिया अधिक वेगवान होणार १३ विभागांची नव्याने रचना, मंत्रिमंडळ बैठकीत ४ मोठे निर्णय...


**वृत्तसंस्था मुंबई**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंत्रालयीन विभागांच्या पुनर्रचनेसह अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. मंत्रालयीन विभागांच्या पुनर्रचनेस सामान्य प्रशासन विभागाकडून मान्यता देण्यात आली असून १३ विभागांची पुनर्रचना होणार आहे. यामुळे एकाच विभागात असलेल्या दोन उपविभागांचे स्वतंत्र विभाग होणार आहेत. सध्या ३३ प्रशासकीय विभाग असून त्यांची संख्या १० ने वाढून ४३ पर्यंत पोहोचणार आहे. विभागांची पुनर्रचना होणार असली तरी नवीन पद निर्मिती मात्र होणार नाही. पुनर्रचनेमुळे आता सदर विभागांना अधिक सुलभपणे काम करता येईल, अशा पद्धतीने



कामकाजांची विभागणी होणार असून यातून निर्णय प्रक्रिया गतीमान होण्यास मदत होणार आहे. मंत्रिमंडळ बैठकीत या निर्णयासह इतरही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून राज्यातील नवीन महाविद्यालयांना अंतिम मान्यता, विस्तारीकरणात नवीन विद्याशाखा, अभ्यासक्रम व नवीन विषय, तुकडी यांना मान्यता देण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक अधिनियम २०१६ मध्ये सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली आहे. अर्थ खात्याने केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियम २०१७ मधील तरतुदींना सुसंगत आणि सूसत्रतेसाठी महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम २०१७ मध्ये सुधारणा तसेच त्याअन्वये महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) विधेयक २०२६ मध्ये सुधारणा करण्यास मान्यता दिली आहे. दरम्यान, उद्योग विभागाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडसाठी कर्ज उभारणीकरता अधिकारात वाढ करण्याचा निर्णय घेतला असून अध्यादेश काढण्यास तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ मध्ये सुधारणा करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

# नाही जळ- पापाची टोचणी!



पर्यावरणदिन देश-राज्यात उत्साहात साजरा झाला. साफसफाईचा जागरही दिसून आला. प्रामाणिक प्रयत्नांचे स्वागतच; परंतु स्वच्छ केलेले नदी, नाले, रस्ते यांसह इतर सार्वजनिक ठिकाणांवर राबवलेल्या या मोहिमांचे पुढे काय होते, नैसर्गिक स्रोतांसह संबंधित जागा पुढे स्वच्छ राहतात काय, डांगोरे पिटून झालेली रोपलागवड खरोखरच तगते काय, अशा प्रश्नांची उत्तरे दुर्दैवाने नकारार्थीच आहेत. ती तशी का आहेत, हे सारेच जाणून असल्याने तपशील देण्याची आवश्यकताच नाही. प्रसारमाध्यमे अन् अलीकडे समाजमाध्यमांच्या वाढीच्या काळात दिखाऊ ङ्गसाफसफाईफ वाढत गेली, हाही पैलू. या मोहिमा म्हणजे निव्वळ चमकोगिरी; तरीही अनेकांच्या लेखी ते समाजकार्य. परवा नाशिकमध्येही नंदिनी नदीची स्वच्छता चर्चेचा विषय न ठरावा तरच नवल! दक्षिण गंगा म म्हटल्या जाणाऱ्या गोदावरीची नंदिनी ही उपनदी. साक्षात भगवान शंकराने जटा आपटलेल्या ब्रह्मगिरी पर्वतरांगेतील संतोषा नामक छोट्याशा डोंगरातून ती उगम पावते. गोदावरीइतके धार्मिक, पौराणिक स्थानमहात्म्य नंदिनीच्या वाट्याला आलेले नाही. नदीचे मूळ नाव नासर्डी म्हणजे नासाडी करणारी. ती अपभ्रंशाने नासर्डी झाली. उन्हाळ्यात आटणारी-नासणारी म्हणूनही नासर्डी. शहर वाढले तशी ती बकाल बनली; पण अलीकडे नंदिनी म्हणून नावारूपाला आणली गेली. तिच्या पुनरुज्जीवनाचे सोपस्कार अनेकदा झाले. परंतु, ते अपयशी ठरले. काही वर्षांपूर्वी ङ्गमटाफ्ने सुरू केलेल्या ङ्गनंदिनी वाचवाफ अभियानात खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही तिला गतवैभव मिळवून देण्याचा शब्द दिला होता. नागपूरच्या नाग नदीचा दाखलाही दिला गेला होता. परंतु, दुर्दैवाने नासर्डीचा श्वास मोकळा झालाच नाही. तसा तो ङ्गनागफ्वाही झाला नाही हा भाग अलाहिदा. समर्थ रामदासांनी टाकळीत याच नासर्डीच्या तीरावर एक तप कठोर तपश्चर्या केली. आज ते असते तर त्यांनी साधनेचे ठिकाणच बदलले असते, इतकी या नदीची अवस्था नाजूक आहे. कचरा, अस्वच्छता, दुर्गंधी, प्रदूषण, अतिक्रमणे, माती-रेती उपशाने ती बेजार आहे. त्याला नाशिककरांसह सारेच जबाबदार. रामकुंडापासून हाकेच्या अंतरावर वाहणाऱ्या आणि पौराणिक महत्त्व असलेल्या वाघाडी नदीला तर चक्क नाला म्हणून संबोधले जाणे वेदनादायीच. गोदावरीतील सांडपाणी आणि मलजलाची घुसळण आजही थांबलेली नाही. कुंभपर्वासाठी धावाधाव होते, नंतर मात्र ङ्गयेरे माझ्या मागल्याफ अशी परिस्थिती असते. नदी स्वच्छतेबाबत पंचवीस वर्षांत गाजावाजाच्या पलीकडे विशेष काही घडले नाही. कोणी त्याबद्दल जाब विचारल्याचेही ऐकिवात नाही. साठ हजार वर्षांपर्यंत भागीरथीचे ( गंगा नदी ) स्नान केल्याने जे फल प्राप्त होते, ते सिंहस्थ कुंभपर्वात गोदावरी स्नानाने मिळते, असे म्हटले जाते. परंतु, गोदावरीपाठोपाठ नासर्डीचाच सर्वाधिक सहवास येणाऱ्या भाविकांना लाभणार आहे. पाहुण्यांना तिचे स्वच्छ की यातनादायी, ओंगळवाणे रूप दाखवायचे, याचा गांभीर्याने विचार व्हावा. नदीच्या पोटातून दोन-चार ट्रक कचरा बाहेर निघाला, काठावर ङ्गड्रेनेज लाइनफ, मलनिस्सारण केंद्रे उभी राहत आहेत हेही नसे थोडके. श्रेयवादात अडकण्यापेक्षा जीवनवाहिनी स्वच्छ होते आहे, हे महत्त्वाचे. नद्यांच्या संवर्धनासाठी दिखाऊ नव्हे, तर दीर्घकाळ टिकाऊ ठरणाऱ्या मोहिमांची आवश्यकता आहे. त्यात लोकचळवळ हासुद्धा कळीचा मुद्दा. लंडनमध्ये ङ्गबायोलॉजिकल डेडफ अशी हिणवली गेलेली थेम्स नदी चक्क जिवंत होऊ शकली. लोकसहभागातून उभ्या राहिलेल्या मोहिमांमुळे आज ती जगातील सर्वाधिक स्वच्छ नद्यांच्या यादीत अग्रस्थानी आहे. पॅरिसमधील सीन नदीसुद्धा नुकतीच वाचविण्यात आली. कुंभमेळामंत्री किंवा त्या-त्या जिल्ह्यातील धुरिणांनी सुरू केलेली स्वच्छतेची वारी उद्या अशा एखाद्या निष्कर्षापर्यंत गेल्यास महाराष्ट्र त्यांना दुवाच देईल. कुंभमेळ्यापूर्वी पापमुक्त होऊन शुचिर्भूत होण्याची ही संधी राजकारण्यांनी दवडू नये इतकेच.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# भारतीय अर्थव्यवस्था सुसाट! विकास दर 7.7 टक्क्यांवर : चौथ्या तिमाहीत जीडीपी वाढ 7.8 टक्के

■ मुंबई/वृत्तसंस्था

युध्द, जगातील तेल संकट आणि महागाई असे अनेक संकट असतानाही जानेवारी ते मार्चच्या तिमाहित भारताचा जीडीपीची वाढ चांगली आहे. आर्थिक वर्ष २०२६ चा चौथ्या तिमाहित अंदाजापेक्षाही जीडीपीची आकडे चांगले आले आहेत. आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी भारताची रिअल जीडीपी ग्रोथ ७.७ टक्के नोंदवला गेला आहे. आर्थिक वर्षाच्या चौथ्या तिमाहीचा जीडीपी ग्रोथ रेट ७.८ टक्के राहिला असून गेल्या तिमाहित ही वाढ ८ टक्के होती.

नॅशनल स्टॅटेस्टिक्स मिनिस्ट्रीच्या नुसार मार्चमध्ये संपलेल्या आर्थिक वर्षात सरकारची आशा होती की अर्थव्यवस्था ७.७ टक्के वाढली आहे. मात्र, फेब्रुवारीत अर्थव्यवस्थेची वाढीचा अंदाज ७.६ टक्के लावण्यात आला होता. भारताच्या जीडीपीचे




हे आकडे सांगतात की ग्लोबल अनिश्चितता आणि अनेक आर्थिक आव्हानानंतरही भारतीय अर्थव्यवस्था मजबूत बनलेली आहे. देशाच्या नॉमिनल जीडीपीत ८.९ टक्के वाढ राहिली आहे. तसेच एफवाय २०२५-२६ मध्ये रिअल आणि नॉमिनल जीव्हीए मध्ये क्रमशः ७.१ टक्के आणि ९.१ टक्के वाढ राहिली आहे. कृषी आणि मासळी उत्पादनात क्षेत्रात ३.२ टक्क्यांची वाढ पहायला मिळाली आहे. सेकेंड्री आणि टर्शियरी सेक्टरने देखील अर्थव्यवस्थेला सपोर्ट केलेला आहे. ज्यात अनुक्रमे ८.८ टक्के आणि ९.३ टक्के वाढ पाहायला मिळाली आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये रिअर जीडीपी वा जीडीपी ३२३.१२ लाख कोटी रुपयांवर पोहचला आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये सुधारित जीडीपी २९९.८९ लाख कोटी रुपये होती. नॉमिनल जीडीपी ३४६.३६ लाख कोटी रुपयांवर पोहचला आहे. गेल्या आर्थिक वर्ष २०२४-२५ दरम्यान हा ३१८.०७ लाख कोटी होता.

## या क्षेत्रांमध्ये डबल डिजिट वाढ

■ आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये, उत्पादन, व्यापार, दुरुस्ती, हॉटेल्स, वाहतूक, दळणवळण, प्रसारण आणि साठवणूक सेवा, तसेच वित्तीय, स्थावर मालमत्ता आणि व्यावसायिक सेवा या क्षेत्रांमध्ये स्थिर आणि चालू दोन्ही किमतींवर डबल डिजिट वाढ होण्याचा अंदाज आहे. खर्चाच्या दृष्टिकोनातून, खाजगी अंतिम उपभोग खर्च आणि एकूण स्थिर भांडवल निर्मिती या दोन्हीत आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये ७.५ टक्के पेक्षा जास्त वाढ होण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

## महागाईबाबत चिंता

■ आरबीआय गव्हर्नर संजय मल्होत्रा म्हणाले की, सध्या किरकोळ महागाई निर्धारित मर्यादेत असली तरी, जागतिक तणावामुळे वाढणाऱ्या इंधन आणि ऊर्जा किमती भविष्यात किरकोळ बाजारावर आणि सर्वसामान्यांच्या खिशावर ताण आणू शकतात. येत्या काळात महागाई वाढण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

# भारताकडून आता अमेरिका भरपूर पैसे कमावते ; ट्रम्प यांचा दावा : भारत-अमेरिका यांच्यात लवकरच व्यापार करार

■ वॉशिंग्टन/वृत्तसंस्था

पंतप्रधान नरेंद्र मोदी माझे अत्यंत चांगले मित्र आहेत. भारताने अनेक वर्षे व्यापारात अमेरिकेचा फायदा घेतला, मात्र आता परिस्थिती पूर्णपणे उलट झाली असून अमेरिका भारताकडून भरपूर पैसे कमावत आहे, असा दावा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला आहे. वॉशिंग्टन येथील 'ओव्हल ऑफिस'मध्ये पत्रकारांशी बोलताना ट्रम्प यांनी मोदींचे कौतुक केले, भारत आणि अमेरिकेत लवकरच एका महत्त्वपूर्ण व्यापार करारावर शिक्कामोर्तब होईल, असे संकेतही दिले.

गेल्या अनेक वर्षांपासून भारत आणि अमेरिकेतील व्यापारी असंतुलनाचा फायदा भारताला मिळत होता, मात्र आता हे चित्र बदलल्याचे ट्रम्प यांनी म्हटले. भारत पूर्वी अमेरिकन उत्पादनांवर भरमसाठ शुल्क आकारत होता, परंतु आता दोन्ही देशांमधील



आर्थिक संबंध अधिक मजबूत करण्यासाठी आणि जुने वाद मिटवण्यासाठी वेगाने प्रयत्न सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर, १ ते ४ जून दरम्यान नवी दिल्लीत दोन्ही देशांच्या प्रतिनिधींमध्ये चार दिवसांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. 'युनायटेड स्टेट्स ट्रेड रिप्रेझेंटेटिव्ह'च्या मुख्य वाटाघाटीकारांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने भारतीय अधिकाऱ्यांशी वस्तूंचा व्यापार, सीमाशुल्क प्रक्रिया, व्यापार सुलभता आणि आर्थिक सुरक्षा सहकार्य यांवर सविस्तर चर्चा केली. दोन्ही बाजूंनी ही चर्चा सकारात्मक असल्याचे म्हटले असून, लवकरच एका परस्पर फायदेशीर अंतरिम व्यापार करारावर स्वाक्षरी होण्याची शक्यता आहे. भारतातील अमेरिकेचे राजदूत सर्जिओ गोर यांनी सांगितले की, व्यापार कराराची बोलणी आता अंतिम टप्प्यात असून केवळ काही मोजकेच मुद्दे शिल्लक आहेत. दुसरीकडे, भारताचे वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनीही बहुतांश मुद्द्यांवर तोडगा निघाल्याचे स्पष्ट केले आहे. कराराचा पहिला टप्पा जाहीर करण्यापूर्वी शिल्लक तपशीलांना अंतिम रूप देण्याचे काम सध्या सुरू आहे. एकीकडे व्यापार करार अंतिम टप्प्यात असतानाच, ट्रम्प प्रशासनाकडून भारतासह जगातील ६० देशांतून होणाऱ्या आयातीवर १२.५ टक्के अतिरिक्त शुल्क लावण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे भारतीय उद्योग जगतात चिंतेचे वातावरण आहे. रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी म्हटले आहे की, अमेरिका भारतावर रशियासोबतच्या त्याच्या संबंधांसह अनेक मुद्द्यांवर दबाव आणण्याचा प्रयत्न करत आहे.

# मराठा आंदोलनांतील मृतांच्या वारसांना १० लाखांची मदत

■ मुंबई/वृत्तसंस्था

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी झालेल्या विविध आंदोलनांतील उर्वरित ३४ मृतांच्या कायदेशीर वारसांना राज्य सरकारकडून प्रत्येकी १० लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर करण्यात आली आहे. आठ जिल्ह्यांतील या कुटुंबांसाठी एकूण ३ कोटी ४० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, यामुळे मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनादरम्यान उपस्थित करण्यात आलेल्या एका महत्त्वाच्या मागणीची पूर्तता झाली आहे.

मराठा समाजाच्या आंदोलनात आतापर्यंत एकूण ३०९ कार्यकर्त्यांचा मृत्यू झाला असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सरकारने यापूर्वीच त्यांच्या वारसांसाठी २७ कोटी ५० लाख रुपये मंजूर केले होते. मात्र, यातील ३४ कुटुंबांची मदत प्रलंबित होती. अंतरवाली सराटी येथील उपोषणादरम्यान जरांगे पाटील यांनी हा प्रश्न लावून धरला होता. त्यानंतर मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून ही मदत तातडीने मंजूर केली. यामध्ये बीडमधील १५, धाराशिव ५, परभणी ४, हिंगोली ४, नांदेड ३, जालना १, छत्रपती संभाजीनगर १ आणि लातूरमधील १ कुटुंबाचा समावेश आहे. दरम्यान, जरांगे यांनी उपोषण मागे घेतल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मनोज जरांगे पाटील यांना दिलेली सर्व आश्वासने जाहीर आहेत. आमचे सरकार मराठा समाजाला न्याय देण्याच्या भूमिकेवर ठाम असून, त्यानुसारच तातडीने कारवाई केली जात आहे. विखे पाटील यांनीही उपसमितीच्या बैठकीत सर्व मागण्यांवर सकारात्मक आणि वेगाने काम सुरू असल्याचे स्पष्ट केले.

# अन्नामलाईंनी केली नव्या पक्षाची घोषणा; भाजपला रामराम ठोकलाच



■ चेन्नई/वृत्तसंस्था

तमिळनाडू भाजपचे माजी प्रदेशाध्यक्ष के. अन्नामलाई यांनी शुक्रवारी एका नवीन पक्षाची स्थापना करत असल्याची घोषणा केली. सोशल मीडियावर पोस्ट केलेल्या एका व्हिडिओ संदेशात अन्नामलाई म्हणाले, आज आम्ही एका चळवळीची सुरुवात करत आहोत. आमचा राजकीय पक्ष तमिळनाडूमध्ये २०३१ मध्ये होणाऱ्या पुढील विधानसभा निवडणुका लढवेल.

भाजपचा सदस्य म्हणून राहणे आणि तमिळ हिताच्या मुद्द्यांशी जोडलेले राहणे, या दोन गोष्टींपैकी एकाची निवड करणे माझ्यासाठी अत्यंत कठीण होते. मी ४ डिसेंबर २०२५ रोजी पक्षाला माझ्या राजीनाम्याच्या निर्णयाबद्दल कळवले होते. पक्षाने मला पक्ष सोडण्यापूर्वी निवडणुका पूर्ण करण्यास सांगितले होते. अन्नामलाई यांनी २ जून रोजी भाजपचा राजीनामा दिला होता; त्यांचे राजीनामा पत्र शुक्रवारी समोर आले. राजीनाम्याचे कारण स्पष्ट करताना त्यांनी लिहिले की, गेल्या १८ महिन्यांपासून पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाशी (हायकमांड) त्यांचे मतभेद होते आणि आता त्यांचे विचार एकमेकांशी जुळत नव्हते.

## निवडणूक लढवण्याची घोषणा

■ तमिळनाडूमध्ये २०३१ मध्ये होणाऱ्या पुढील विधानसभा निवडणुका लढवण्याची घोषणाही के. अन्नामलाई यांनी केली. अन्नामलाई गेल्या सहा वर्षांपासून भाजपशी जोडलेले होते. त्यांच्या नेतृत्वाखाली भाजपने २०२१ आणि २०२६ च्या विधानसभा निवडणुका लढवल्या. तमिळनाडूमध्ये पक्षाची मते मिळवण्याची टक्केवारी (व्होट शेअर) २०२१ मधील २.६२ टक्क्यावरून वाढून २०२६ मध्ये सुमारे ११.३ टक्क्यांपर्यंत पोहोचली.

# महिलेचं जबरदस्ती धर्मांतर करण्याचा प्रयत्न; नकार देताच विनयभंग अन् मारहाण

■ नागपूर/वृत्तसंस्था

नागपूर जिल्ह्याच्या कामठी तालुक्यातील जुनी कामठी परिसरातील मरियम अम्मा दर्ग्यात एका महिलेचे बळजबरीने धर्मांतर करण्याचा प्रयत्न झाल्याचा गंभीर प्रकरण समोर आलं आहे. या प्रकरणी कोलकात्यातील महिलेच्या तक्रारीवरून कन्हान पोलिसांनी सहा जणांविरुद्ध विविध कलमांनुसार गुन्हा दाखल केला असून तिघांना अटक करण्यात आली आहे. या घटनेचा तपास करण्यासाठी विशेष तपास पथक (SIT) स्थापन करण्यात आले आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कोलकात्यातील डमडम परिसरात राहणारी महिला एप्रिल महिन्यात मरियम अम्मा दर्ग्यातील उर्स कार्यक्रमासाठी कामठीत आली होती. मागील तीन ते चार वर्षांपासून ती दरवर्षी उर्ससाठी येथे येत होती. यावेळी काही व्यक्तींनी तिच्यावर धर्मांतरासाठी दबाव टाकल्याचा आरोप महिलेने आपल्या तक्रारीत केला आहे. महिलेच्या म्हणण्यानुसार, तिने धर्मांतरास विरोध केल्यानंतर तिचा विनयभंग करण्यात आला, मारहाण करण्यात आली. तसेच जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. तिला १८ ते १९ एप्रिलदरम्यान डांबून ठेवण्यात आल्याचाही आरोप करण्यात आला आहे. त्यानंतर तिने स्वतःची सुटका करून कोलकात्यात परत जात उपचार घेतले आणि स्थानिक डमडम पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. घटनास्थळ कन्हान पोलिसांच्या हद्दीत येत असल्याने डमडम पोलिसांनी झिरो एफआयआर नोंदवून प्रकरण कन्हान पोलिसांकडे वर्ग केले. झिरो एफआयआर प्राप्त होताच कन्हान पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली. यानंतर नागपूर पोलिसांचे एक पथक कोलकात्यात जाऊन पीडित महिलेची सविस्तर चौकशी केली. या प्रकरणात ताजी तनविरुद्दीन कलीमउद्दीन (५२), ताजीन मुस्ताफिजुद्दीन तनविरुद्दीन (२४) आणि तेजस आनंद खोब्रागडे २४) यांना २९ मे रोजी अटक करण्यात आली आहे. एकूण सहा आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल असून त्यापैकी दोन आरोपी महिला आणि एक वयोवृद्ध व्यक्ती असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

महिलेच्या तक्रारीनुसार मारहाण, विनयभंग, धर्मांतरासाठी दबाव तसेच हत्येच्या प्रयत्नासंबंधीही गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी विशेष तपास पथक (SIT) स्थापन केले असून तांत्रिक तपासासाठी काही इलेक्ट्रॉनिक उपकरणे जप्त करण्यात आली आहेत. पोलिसांचे म्हणणे आहे की, या प्रकरणाचा सर्व बाजूंनी सखोल तपास केला जात असून अशा प्रकारे दबाव आणून धर्मांतर करण्याचे आणखी प्रकार घडले आहेत का, याचाही शोध घेतला जाणार आहे.

## प्रेमसंबंधाचा रक्तरंजित शेवट; एक्स गर्लफ्रेंडवर २० हून अधिक वार, नंतर तरुणाचा आत्महत्येचा प्रयत्न

■ मोहाली/वृत्तसंस्था

येथे घडलेल्या एका धक्कादायक घटनेने संपूर्ण परिसर हादरून गेला आहे. एका खाजगी कंपनीत काम करणाऱ्या महिलेची तिच्याच सहकाऱ्याने कार्यालयात घुसून निर्घृण हत्या केली. या घटनेनंतर आरोपीने स्वतःच्या गळ्यावर वार करत आत्महत्येचाही प्रयत्न केला. ही संपूर्ण घटना कार्यालयातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून त्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरला आहे.



हरविंदर मान उर्फ हॅरी असे आरोपीचे नाव आहे. तर मृत महिलेचे नाव डिंपल आहे. दोघेही मोहालीतील एका पॅकर्स अँड मूव्हर्स सेवा देणाऱ्या खासगी कंपनीत गेल्या तीन वर्षांपासून एकत्र काम करत होते. या काळात त्यांच्यात मैत्री झाली होती आणि ते रिलेशनशिपमध्ये आले. मात्र काही काळापूर्वी त्यांचे ब्रेकअप झाले होते.

गुरुवारी सायंकाळी सुमारे ७.४० वाजण्याच्या सुमारास आरोपी कार्यालयात पोहोचला. त्यावेळी डिंपल आपल्या डेस्कवर बसून काम करत होती. सीसीटीव्ही फुटेजनुसार, आरोपीने अचानक तिच्यावर मागून धारदार शस्त्राने हल्ला केला. जीव वाचवण्यासाठी महिलेने पळण्याचा प्रयत्न केला, मात्र आरोपीने तिचा पाठलाग करत तिला कंपनीच्या मेन गेटवर गाठले. त्यानंतर तिच्या केसांना धरून ओढत तिच्यावर पुन्हा पुन्हा वार केले. कार्यालयातील इतर कर्मचाऱ्यांनी आरोपीला रोखण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याचा आक्रमकपणा इतका होता की कोणालाही त्याला थांबवू शकले नाही. डिंपल जमिनीवर कोसळल्यानंतरही आरोपीने तिच्यावर २० हून अधिक वेळा वार केल्याचे तिथल्या लोकांनी सांगितले आहे. हल्ल्यानंतर आरोपी कार्यालयाच्या आत गेला आणि स्वतःच्या गळ्यावरही वार करण्यास सुरुवात केली. त्याने स्वतःच्या गळ्यावर तब्बल ३० हून अधिक वार केल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. घटनेनंतर घाबरलेल्या कर्मचाऱ्यांनी तातडीने पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी दोघांनाही तातडीने जवळच्या फोर्टिस रुग्णालयात त्या दोघांना दाखल केले. मात्र डॉक्टरांनी डिंपलला मृत घोषित केले, तर आरोपीची प्रकृती गंभीर असल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, या हत्येमागे नातेसंबंधातील वाद कारणीभूत असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे.

## विद्यार्थ्याकडून वर्गमित्राची हत्या, झोपेत असताना चाकूने सपासप वार करत संपवलं

■ शिरूर/वृत्तसंस्था

पुण्यामध्ये विद्यार्थ्याने वर्गमित्राची निर्घृण हत्या केली. झोपेत असलेल्या तरुणावर चाकूने सपासप वार करत जागीच संपवण्यात आले. ही घटना पुणे जिल्ह्यातील आंबेगावमध्ये घडली. मैत्रीला काळीमा फासणाऱ्या या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली. क्षुल्लक कारणावरून तरुणाची हत्या करण्यात आली असल्याची माहिती समोर आली आहे. पोलिस सध्या या प्रकरणाचा तपास करत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, आंबेगाव तालुक्यातील गोणवडी आयटीआयमध्ये ही घटना घडली. आरोपी आणि हत्या करण्यात आलेला तरुण एकाच वर्गात शिकत होते. दोघांमध्ये किरकोळ कारणावरून वाद झाल होता. या वादातूनच सौरभ संतोष साखरे (२३ वर्षे) नावाच्या विद्यार्थ्याची हत्या करण्यात आली. शुभम कदम असे आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी त्याला अटक केली. या घटनेनंतर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमधील वाढत्या हिंसक प्रवृत्तीबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. शुभम कदम आणि सौरभ साखरे दोघे एकाच वर्गात शिक्षण घेत होते. गुरूवारी रात्री सौरभ आयटीआयच्या इमारतीवरील टेरेसवर झोपला होता. त्याचवेळी शुभम तिथे आला. त्याने झोपलेल्या सौरभवर धारदार चाकूने सपासप वार केले. या हल्ल्यामध्ये सौरभ गंभीर जखमी झाला. जास्त रक्तस्राव झाल्यामुळे त्याचा जागीच मृत्यू झाला. दोघांमध्ये नेमका वाद काय झाला होता याचा तपास पोलिस करत आहेत. घटनेची माहिती मिळताच घोडेगाव पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पंचनामा करून पोलिसांनी आरोपी शुभम कदमला ताब्यात घेतले. त्यानंतर त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करत त्याला अटक करण्यात आली. त्याची सध्या कसून चौकशी सुरू आहे.

## शिंदेसेनेच्या नगरसेवकावर बलात्काराचा गुन्हा; गुंगीचे औषध देऊन अत्याचार, व्हिडीओ काढून केलं ब्लॅकमेल



■ नवी मुंबई/वृत्तसंस्था

नवी मुंबईतील शिवसेना (शिंदे गट) स्वीकृत नगरसेवक साहिल चौगुले यांच्यावर बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रबाळे पोलीस ठाण्यात हा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. साहिल चौगुले यांनी आपल्यावर अनेक वेळा अत्याचार केले आणि आपले अश्लील फोटो काढून ब्लॅकमेल केले, असा आरोप पीडित महिलेने केला आहे.

साहिल चौगुले हे नवी मुंबई महानगरपालिकेतील विरोधी पक्षनेते आणि शिवसेनेचे नगरसेवक विजय चौगुले यांचे भाचे आहेत. दरम्यान, ज्या महिलेने हा बलात्काराचा गुन्हा दाखल केला आहे, त्याच महिलेने 'हा सर्व प्रकार गैरसमजातून झाला' असल्याचा अर्ज मे महिन्यात पोलिसांना दिला होता. मात्र, त्यानंतर काल मध्यरात्री तिने पुन्हा पोलीस ठाण्यात जाऊन साहिल चौगुले यांच्याविरोधात बलात्काराची तक्रार दिली. विशेष म्हणजे याच महिलेने यापूर्वी इतर तीन पुरुषांविरोधातही बलात्काराच्या तक्रारी दाखल केल्या होत्या आणि नंतर त्या मागे घेतल्याची माहिती समोर आली आहे. रबाळे पोलिसांनी बुधवारी २५ वर्षीय साहिल चौगुले यांच्या विरोधात बलात्कार आणि पाठलाग केल्याचा गुन्हा दाखल केला. चौगुले यांनी सर्व आरोप खोटे असून हा राजकीय कट असल्याची म्हटले आहे. चौगुलेंवर जुलै २०२४ पासून एका २६ वर्षीय महिलेवर अनेक वेळा लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. त्याचा साथीदार, ऐरोलीच्या चिंचपाडा येथील रहिवासी अमित मौर्य याला सहआरोपी बनवण्यात आले आहे. कारण त्याने स्वतःच्या नावावर हॉटेलची खोली बुक केली होती, जिथे चौगुलेने कथितरित्या त्या महिलेवर लैंगिक अत्याचार केला, असा आरोप आहे.

प्रकरणाचा तपास सुरू असल्याने चौगुले आणि मौर्य यांना अद्याप अटक करण्यात आलेली नाही, असे वरिष्ठ निरीक्षक बाळकृष्ण सावंत यांनी सांगितले. आरोपावर चौगुले म्हणाले की, त्या महिलेने बलात्काराचे खोटे आरोप केले होते. हे तिने पैसे उकळण्यासाठी अनेकदा करते. गेल्या वर्षी त्या महिलेने राबाळे एमआयडीसीच्या एका पोलीस निरीक्षकाला लक्ष्य करून त्यांच्याविरुद्ध खोटी तक्रार दाखल केली होती. मी राबाळे पोलिसांना एक ऑडिओ क्लिप सादर केली आहे, ज्यामध्ये तक्रारदार महिला असा दावा करत आहे की, ती तिच्यावर लैंगिक अत्याचार झाल्याची खोटी तक्रार दाखल करून आपल्या लोकांना जाळ्यात ओढते आणि पैसे उकळण्यासाठी ब्लॅकमेल करते.

महिलेने तक्रारीत गंभीर आरोप केले आहेत. जुलै २०२४ मध्ये महिला तिथे काम करणाऱ्या तिच्या काकांना भेटण्यासाठी चौगुले यांच्या ऐरोली येथील अपार्टमेंटमध्ये गेली होती. तेव्हा त्यांनी तिला तिचे काका परत येईपर्यंत अपार्टमेंटमध्ये थांबायला सांगितले. त्यांनी गुंगीचे औषध मिसळलेले शीतपेय दिले आणि ती बेशुद्ध पडली. जेव्हा तिला शुद्ध आली, तेव्हा तिच्या लक्षात आले की त्यांनी तिच्यावर लैंगिक अत्याचार केला होता. चौगुले यांनी तिचे नग्न फोटो सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी दिली. त्यांनी तिच्या पतीला आणि अल्पवयीन मुलाला इजा करण्याची धमकीही दिली, असे तिच्या तक्रारीत म्हटले आहे.

# 14 जूनला रंगणार भारत-पाकिस्तान महामुकाबला

## महिला टी-२० विश्वचषकमध्ये पारंपरिक प्रतिस्पर्धी येणार आमनेसामने

**मुंबई/वृत्तसंस्था**

भारत विरुद्ध पाकिस्तानमध्ये महामुकाबला होणार आहे. या सामन्याकडे जगभरातील चाहत्यांचे लक्ष लागले आहे. आयसीसी महिला टी-२० विश्वचषक २०२६ च्या निमित्ताने दोन्ही पारंपरिक प्रतिस्पर्धी पुन्हा एकदा आमनेसामने येणार आहेत. १४ जून रोजी भारत विरुद्ध पाकिस्तानमध्ये सामना होणार आहे. १२ जूनपासून आयसीसी महिला टी-२० वर्ल्ड कप सुरू होणार आहे.

ही स्पर्धा इंग्लंड आणि श्रीलंकामध्ये होणार आहे. १२ जून ते ५ जुलै पर्यन्त वर्ल्ड कप स्पर्धा सुरू असणार आहे. अंतिम सामना प्रसिद्ध लॉर्डस मैदानावर खेळवला जाणार आहे. भारतीय महिला क्रिकेट आधीच इंग्लंडला रवाना झाला होता. इंग्लंडविरुद्ध भारताने टी-२० सामन्यांची मालिका खेळवली गेली. या मालिकेत भारताचा पराभव झाला आहे. मात्र आता वर्ल्ड कप जिंकण्यासाठी भारत सज्ज झाला आहे.

भारतीय महिला क्रिकेट संघ आपला पहिला सामना १४ जून रोजी पाकिस्तान विरुद्ध खेळणार आहे. हा सामना महामुकाबला म्हणून पाहिला जाणार आहे. यावेळच्या विश्वचषकात एकूण १२ संघ सहभागी होत असून त्यांची दोन गटात विभागणी करण्यात आली आहे. महिला टी२० विश्वचषक २०२६ च्या स्पर्धेतील उपविजेत्या संघाला ११,७०,००० अमेरिकी डॉलर्स मिळतील. दोन्ही उपांत्य फेऱ्यांमधील पराभूत संघांना ६,७५,००० अमेरिकी डॉलर्स मिळतील.



### विजेत्या संघाला मिळणार २३ लाख ४० हजार अमेरिकन डॉलर्स

आयसीसीच्या घोषणेनुसार, महिला टी-२० विश्वचषक २०२६ जिंकणाऱ्या संघाला २३,४०,००० अमेरिकन डॉलर्स रक्कम मिळणार आहे. ही रक्कम आयपीएल विजेत्या आरसीबीला मिळालेल्या बक्षीस रकमेपेक्षाही जास्त असणार आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळूरला २०२६ चा महिला टी२० विश्वचषक जिंकल्याबद्दल २० कोटी रुपये मिळाले होते.

स्पर्धेतील प्रत्येक गट सामन्यात विजय मिळवणाऱ्या संघाला स्वतंत्र बोनसही दिला जाणार आहे. प्रत्येक विजेत्या संघाला ३१,१५४ अमेरिकी डॉलर्स मिळणार आहे. विशेष म्हणजे स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व १२ संघांना किमान २,४७,५०० अमेरिकी डॉलर्सचा बक्षीस निधी मिळणार आहे. त्यामुळे लहान संघांनाही आर्थिकदृष्ट्या मोठा फायदा होणार आहे.

# पाकिस्तानने ऑस्ट्रेलियाविरुद्ध वनडे मालिका जिंकली

**लाहोर/वृत्तसंस्था**

गद्दाफी स्टेडियममध्ये पाकिस्तानने ऑस्ट्रेलियाला ४ विकेट्सने हरवले. या विजयासह पाकिस्तानने ऑस्ट्रेलियाविरुद्ध सलग तिसरी वनडे मालिका आपल्या नावावर केली. ऑस्ट्रेलिया प्रथम फलंदाजी करताना ४२ षटकांत १५७ धावांवर सर्वबाद झाली होती. प्रत्युत्तरात पाकिस्तानने ४१.१ षटकांत ६ विकेट्स गमावून १५८ धावांचे लक्ष्य गाठले.

पाकिस्तानसाठी बाबर आझमने सर्वाधिक ४० धावा केल्या. शादाब खानने नाबाद २९ धावांची खेळी करत संघाला विजय मिळवून दिला. ऑस्ट्रेलियाकडून मॅथ्यू कुहनेमनने ३८ धावांत ३ विकेट्स घेतल्या, पण संघाला पराभवापासून वाचवू शकला नाही. पावसामुळे सामना १५ मिनिटे उशिरा सुरू झाला होता.

नाणेफेक जिंकून फलंदाजीसाठी उतरलेल्या ऑस्ट्रेलियन संघाची सुरुवात अत्यंत खराब झाली. सामन्याच्या दुसऱ्याच चेंडूवर मॅथ्यू शॉर्ट खाते न उघडता शाहीन शाह आफ्रिदीचा बळी ठरला. त्यानंतर कर्णधार जोश इंग्लिसने ७१ चेंडूंमध्ये ६५ धावांची वेगवान खेळी करत डाव सावरला.

इंग्लिसने ॲलेक्स कॅरी (१९ धावा) सोबत तिसऱ्या विकेटसाठी ५२ धावांची भागीदारी केली. एकेकाळी ऑस्ट्रेलियाचा स्कोअर ३ विकेट्सवर ११९ धावा होता आणि संघ मजबूत स्थितीत दिसत होता. पण हॅरिस रौफने कॅरीला बोल्ड करून भागीदारी तोडली. यानंतर



ऑस्ट्रेलियन संघ विखुरला आणि शेवटच्या ७ विकेट्स ३८ धावा जोडण्यात गमावल्या. मार्नस लाबुशेनही ११ धावा काढून धावबाद झाला.

पाकिस्तानच्या गोलंदाजांनी टर्निंग ट्रॅकचा पुरेपूर फायदा घेतला. शाहीन शाह आफ्रिदी सर्वात यशस्वी ठरला. त्याने आपल्या दुसऱ्या स्पेलच्या सुरुवातीच्या तीन चेंडूंमध्ये जोश इंग्लिस आणि कॅमेरॉन ग्रीनला पॅव्हेलियनमध्ये पाठवून ऑस्ट्रेलियाला मोठा धक्का दिला. शाहीनने ३३ विकेट्स घेतल्या

अबरार अहमदने मॅथ्यू रेनशॉ आणि कूपर कॉनोलीला बाद करत २ विकेट घेतल्या. पाच सामन्यांपासून विकेटसाठी तरसलेल्या शादाब खाननेही लय मिळवली आणि २ विकेट घेतल्या. त्याने ओली पीक आणि ॲडम झाम्पाला बाद केले.

# आर. प्रज्ञानंदनचा नवव्या फेरीत विजय

**ओस्लो/वृत्तसंस्था**

भारतीय ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंदने क्लासिकल गेममध्ये आपल्याच देशाच्या डी. गुकेशवर दणदणीत विजय मिळवून नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेच्या विजेतेपदाच्या शर्यतीत आपले स्थान अधिक मजबूत केले आहे. गुरुवारी मध्यरात्री झालेल्या नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेच्या नवव्या फेरीत त्यांने उल्लेखनीय कामिगीरी करून विजय मिळवला.

भारतीय ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंदने क्लासिकल गेममध्ये आपल्याच देशाच्या डी. गुकेशवर दणदणीत विजय मिळवून नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेच्या विजेतेपदाच्या शर्यतीत आपले स्थान अधिक भक्कम केले आहे. या विजयामुळे प्रज्ञानंद आघाडीवर असलेल्या अमेरिकन वेस्ली सो पेक्षा केवळ अर्ध्या गुणाने मागे आहे, ज्यामुळे अंतिम फेरी रोमांचक होणार आहे. प्रज्ञानंद दुसऱ्या स्थानावर : काळ्या सोंगट्यांनी खेळूनही, प्रज्ञानंदने क्लासिकल गेममध्ये विश्वविजेता गुकेशला पराभूत करुन पूर्ण तीन गुण मिळवले. यामुळे ही प्रतिष्ठित स्पर्धा जिंकणारा पहिला भारतीय खेळाडू बनण्याच्या शर्यतीत तो सामील झाला आहे. नवव्या फेरीनंतर, प्रज्ञानंद १५ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे, जो अमेरिकन ग्रँडमास्टर वेस्ली सो (१५.५) च्या अगदी मागे आहे. फ्रान्सचा अलीरेझा फिरौजा देखील १४.५ गुणांसह तिसऱ्या स्थानावर असून विजेतेपदाच्या शर्यतीत कायम आहे. यामुळे अंतिम फेरीत विजेतेपद जिंकण्याची संधी तीन खेळाडूंना आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे, जो कोणी हे विजेतेपद जिंकेल तो पहिला नॉर्वेजियन बुद्धिबळ चॅम्पियन बनेल. महिलांच्या गटात, विद्यमान विश्व ब्लिट्झ चॅम्पियन बिबिसारा असाउबायेवाने एक फेरी शिल्लक असतानाच विजेतेपद पटकावले, ती आर्मगिडॉन टाय-ब्रेकमध्ये युक्रेनच्या ॲना मुझीचुककडून पराभूत झाली. आता तिचे १६.५ गुण झाले आहेत. काळ्या सोंगट्यांनी खेळणाऱ्या झू जिनरने दिव्या देशमुखला पराभूत करून तीन महत्त्वाचे गुण मिळवले आणि ती दुसऱ्या स्थानावर पोहोचली. कोनेरु हम्पी आर्मगिडॉन टाय-ब्रेकमध्ये महिला विश्व चॅम्पियन जू वेनजुनकडून पराभूत झाली.

# रुमेश थरंगाची ‘वांडा डायमंड लीग’ मध्ये सर्वोत्तम कामगिरी

## ९२.६२ मीटरवर भाला फेकून नवा विक्रम प्रस्थापित

**रोम/वृत्तसंस्था**

श्रीलंकेचा स्टार भालाफेकपटू रुमेश थरंगा पाथिरागे याने प्रतिष्ठित ‘वांडा डायमंड लीग’च्या ‘गोल्डन गाला पिएट्रो मेनिया’ स्पर्धेत इतिहास घडवला आहे. आपल्या कारकिर्दीतील सर्वोत्तम कामगिरी करत त्याने ९२.६२ मीटर अंतरावर भाला फेकून नवीन विक्रम प्रस्थापित केला. पाथिरागेने आपल्या पहिल्याच प्रयत्नात ८४.४९ मीटर अंतराची नोंद केली, जे अंतर विजयासाठी पुरेसे मानले जात होते. मात्र, दुसऱ्या प्रयत्नात त्याने ९० मीटरचा टप्पा ओलांडला. या फेकीसह, २०२६ च्या हंगामात ९० मीटरचा अडथळा पार करणारा तो पहिला खेळाडू ठरला.

९२.६२ मीटर अंतरावर भाला फेकून रुमेशने आंद्रेआस थोरकिल्डसेन यांच्या नावावर २० वर्षांपासून असलेला ९०.३४ मीटरचा जुना विक्रम मोडीत काढला. या ऐतिहासिक कामगिरीमुळे तो जागतिक स्तरावरील सर्वकालीन यादीत आठव्या स्थानावर पोहोचला आणि इतिहासातील दुसरा सर्वोत्तम आशियाई भालाफेकपटू बनला. असे करताना त्याने भारताच्या नीरज चोप्राला मागे टाकले, ज्याने ९०.२३ मीटर अंतराची नोंद केली होती. रुमेशची ही फेक २०२४ च्या ऑलिम्पिक फायनलनंतरची जागतिक स्तरावरील सर्वात लांब फेक ठरली आहे. या कामगिरीमुळे त्याला दोन वेळा जागतिक चॅम्पियन राहिलेल्या अँडरसन पीटर्सवर निर्णायक आघाडी मिळाली; पीटर्स ८३.९१ मीटरच्या फेकीसह दुसऱ्या स्थानावर राहिला, तर जागतिक कांस्यपदक विजेता कर्टिस थॉम्पसन तिसऱ्या स्थानावर आला. विजयानंतर आनंद व्यक्त करताना पाथिरागेने हा क्षण अत्यंत खास असल्याचे सांगितले आणि ही कामगिरी आपल्या कारकिर्दीतील सर्वात महत्त्वपूर्ण घटनांपैकी एक असल्याचे नमूद केले. विजयानंतर पाथिरागे म्हणाला, “आज राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित करण्याचा मी सर्वोत्तम प्रयत्न केला आणि त्यात तीन मीटरची सुधारणा करण्यात मला यश आले. जरी आज माझे केवळ दोनच प्रयत्न वैध ठरले, तरी मी मानसिकदृष्ट्या खूप स्थिर आहे. रबातमध्ये खूप उष्णता होती, पण रोममधील हवामान आल्हाददायक आहे आणि लांब अंतराच्या फेकीसाठी परिस्थिती आदर्श वाटली.”



दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# ‘आऊट ऑफ सिलेबस’ टीमचा पर्यावरणासाठी पुढाकार; वृक्षारोपणातून दिला संवर्धनाचा संदेश



जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधत आगामी मराठी चित्रपट आऊट ऑफ सिलेबसच्या टीमने एक स्तुत्य उपक्रम राबवत पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. चित्रपटाच्या कलाकारांसह निर्माते आणि संपूर्ण टीमने वृक्षारोपण मोहिमेत सहभागी होत पर्यावरण संरक्षणाची सामूहिक जबाबदारी अधोरेखित केली. मनोरंजन क्षेत्रातील व्यक्तींनी सामाजिक बांधिलकी जपत केलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांनी विशेष स्वागत केले.

नवी मुंबईतील मॅक्सिस सिटी येथे पार पडलेल्या या कार्यक्रमात विविध प्रकारच्या रोपांची लागवड करण्यात आली. वाढते प्रदूषण, हवामान बदल, अनियमित पाऊस, वाढते तापमान आणि झपाट्याने होत असलेली वृक्षतोड या जागतिक समस्यांच्या पार्श्वभूमीवर वृक्षसंवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

यावेळी उपस्थितांनी केवळ झाडे लावण्यापुरते न थांबता त्यांचे संगोपन आणि संवर्धन करण्याची शपथही घेतली. कार्यक्रमादरम्यान चित्रपटाच्या टीमने पर्यावरण संरक्षण ही केवळ सरकार किंवा प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असल्याचे सांगितले. प्रत्येकाने आपल्या परिसरात किमान एक झाड लावून त्याची नियमित काळजी घेतली, तर पर्यावरणाच्या रक्षणासाठी मोठे योगदान देता येईल, असा संदेश देण्यात आला. वृक्षारोपणासारख्या छोट्या कृतींचा भविष्यातील पिढ्यांवर सकारात्मक परिणाम होऊ शकतो, याकडेही लक्ष वेधण्यात आले.

या उपक्रमाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे याच माध्यमातून आऊट ऑफ सिलेबस चित्रपटाचे आगळ्यावेगळ्या पद्धतीने प्रमोशन करण्यात आले. चित्रपटाच्या प्रसिद्धीसाठी पर्यावरणपूरक उपक्रमाची निवड करून टीमने सामाजिक जाणीव आणि मनोरंजन यांचा सुंदर संगम साधण्याचा प्रयत्न केला. चित्रपटाचा संदेश केवळ मनोरंजनापुरता मर्यादित न ठेवता समाजापर्यंत सकारात्मक विचार पोहोचवण्याचा प्रयत्न यामागे असल्याचे टीमने स्पष्ट केले.

# जेम्स हॅण्डी यांची गर्लफ्रेंडच्या मुलाकडून हत्या



टॉप गन: मॅव्हरिक' आणि 'जुमान्जी' सारख्या सुपरहिट चित्रपटांसाठी ओळखले जाणारे हॉलिवूड अभिनेते जेम्स हँडी यांचे निधन झाले आहे. लॉस एंजेलिसमधील टार्झाना भागात त्यांच्यावर चाकू हल्ला करण्यात आला. ते ८१ वर्षांचे होते. त्यांच्या गर्लफ्रेंडच्या मुलानेच त्यांची चाकूने वार करत हत्या केल्याचे सांगितले जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ८१ वर्षीय अभिनेत्याची हत्या त्यांच्या प्रेयसीच्या मुलाने केली. लॉस एंजेलिस मध्ये एका व्यक्तीने आपण हत्या केल्याची कबुली देण्यासाठी पोलिसांना फोन केला होता. ही माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. तिथे पोहोचल्यावर पोलिसांना ज्येष्ठ अभिनेते जेम्स हँडी त्यांच्या घराच्या अंगणात रक्तबंबाळ अवस्थेत पडल्याचे दिसून आले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार , ३ जून रोजी सकाळी साधारण ९:३० वाजता, वेस्ट व्हॅली भागात गस्त घालणाऱ्या अधिकाऱ्यांना इरविन स्ट्रीटवरून एक निनावी फोन आला. फोन करणाऱ्या व्यक्तीने सांगितले, 'मी त्या माणसाचा मुलगा आहे; मी नुकतीच त्याची हत्या केली आहे.' घटनास्थळी पोहोचल्यावर पोलिसांना जेम्स हँडी हे त्यांच्या घराच्या समोरच्या अंगणात बेशुद्ध अवस्थेत आढळले; त्यांच्या छातीवर धारदार शस्त्राने वार केल्याची जखम होती. लॉस एंजेलिस येथील एका मेडिकल टीमने त्यांना स्थानिक रुग्णालयात दाखल केले. तिथे डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. हत्या करणाऱ्या व्यक्तीने पोलिसांना फोन करुन कबूली दिली की तो जेम्स हँडी यांच्या गर्लफ्रेंडचा मुलगा आहे. या व्यक्तीची ओळख मायकल ग्लेडहिल (वय ४४) अशी पटली असून पोलिसांनी त्याला अटक केली आहे. या संशयित आरोपीने स्वतःच पोलिसांच्या गाडीला हात दाखवला. पोलीस त्याच्याजवळ येताच त्यांना सांगितले की तुम्ही ज्याचा शोध घेत आहात तो मीच आहे.

जेम्स हॅण्डी यांनी जुमानजी या ब्लॉकबस्टर या सिनेमात त्यांनी पेस्ट कंट्रोलर हे पात्र साकारले होते. याशिवाय टॉप गन या सिनेमात त्यांनी बार टेंडरचे पात्र साकारले होते.

# ‘कृष्णाईच्या लेकी’मध्ये रोहित परशुराम साकारणार ‘शंकर’ची भूमिका



अप्पी आमची कलेक्टर मालिकेत अर्जुनची भूमिका साकारून प्रेक्षकांच्या मनात विशेष स्थान निर्माण करणारा अभिनेता रोहित परशुराम पुन्हा एकदा नव्या मालिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. ‘कृष्णाईच्या लेकी’ या मालिकेत तो ‘शंकर’ ही महत्त्वपूर्ण भूमिका साकारणार आहे. या नव्या प्रवासाबद्दल बोलताना रोहितने आपल्या पात्राविषयी माहिती दिली. तो म्हणाला, मी शंकर हे पात्र साकारत आहे. गावातील सावकार मातोश्रींचा मुलगा, व्यायामाची प्रचंड आवड असलेला आणि कोल्हापूरच्या मातीतला रांगडा गडी अशी त्याची ओळख आहे. तो एका बिनधास्त, सुंदर आणि मनमोकळ्या मुलीला पाहताक्षणी तिच्या प्रेमात पडतो. त्यानंतर त्याच्या आयुष्यात घडणारे सकारात्मक बदल, प्रेम आणि आई यांच्यामध्ये समतोल साधताना होणारी त्याची गोड दमछाक आणि त्याचा संपूर्ण प्रवास प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. रोहितच्या मते, शंकर हे पात्र केवळ रांगडेपणापुरते मर्यादित नसून त्यामध्ये भावनिक पैलूही आहेत. प्रेम, कुटुंब आणि नातेसंबंध यांच्यातील संघर्ष अनुभवणाऱ्या या पात्राचा प्रवास प्रेक्षकांना नक्कीच भावेल, असा विश्वास त्याने व्यक्त केला आहे. या नव्या भूमिकेत रोहित परशुराम कोणता नवा रंग दाखवतो, याची उत्सुकता आता त्याच्या चाहत्यांना लागली आहे.

# दर्जेदार भूमिका मिळत नसल्याची खंत ; हृतिकने केली सोशल कामाची मागणी



बॉलिवूडचा लोकप्रिय अभिनेता पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. यावेळी त्याच्या आगामी चित्रपटांमुळे नव्हे, तर सोशल मीडियावरील एका पोस्टमुळे. चित्रपटांच्या ऑफर्स मिळत असूनही मनासारख्या आणि दर्जेदार भूमिका मिळत नसल्याची खंत व्यक्त करत हृतिकने सोशल मीडियावर कामाची मागणी केली असल्याची चर्चा रंगली आहे. त्याच्या वक्तव्यामुळे चाहत्यांमध्येही उत्सुकता निर्माण झाली आहे.

४ जूनच्या रात्री, हृतिक रोशनने एका परदेशी देशाच्या रस्त्यावर सेल्फी काढतानाचा स्वतःचा एक फोटो शेअर केला. त्यासोबत त्याने लिहिलेले कॅप्शन त्याहूनही अधिक अस्वस्थ करणारे आहे. त्याने लिहिले, मला नुकतेच विचारण्यात आले की मला कोणत्या प्रकारची भूमिका साकारायला आवडेल. पण माझे उत्तर काय असेल याचा मी विचार करत आहे. लक बाय चान्स मधील माझी झफरची भूमिका तुम्हाला आठवते का? मला तशा प्रकारची भूमिका साकारायला आवडेल. पण दिग्दर्शकांना मला फक्त चांगल्या भूमिकांमध्येच पाहायचे आहे. किती दुःखद आहे हे.

हृतिक रोशनला एक अधिक नकारात्मक भूमिका साकारायची आहे, पण त्याची रोमँटिक आणि दयाळू प्रतिमा त्याला सतत सतावत आहे. सिद्धार्थ आनंदने सुपरस्टारच्या पोस्टवर चला तर मग अशी कमेंट केली आहे. हृतिक रोशन आणि सिद्धार्थ आनंद लवकरच एकत्र काहीतरी भव्य करणार असल्याचा अंदाज चाहते लावत आहेत.

हृतिक रोशन शेवटचा 'वॉर २' मध्ये दिसला होता. हा चित्रपट मोठ्या पडद्यावर फारसा यशस्वी झाला नाही. तो सध्या 'क्रिश ४' या सुपरहिरो चित्रपटावर काम करत आहे, ज्याचे दिग्दर्शनही तोच करत आहे. तो 'स्टॉर्म'मध्येही दिसणार आहे.

# खरीप हंगाम २०२६ पिकस्पर्धेत सहभागी होण्याचे कृषी विभागाचे आवाहन

जनसंचलन/ खामगाव

राज्यातील तसेच जिल्ह्यातील पिकांची उत्पादकता वाढविण्यासाठी आणि प्रयोगशील शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी कृषी विभागामार्फत खरीप हंगाम २०२६ साठी पिकस्पर्धा योजना राबविण्यात येत आहे. या स्पर्धेमुळे शेतकऱ्यांना आधुनिक व अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करण्यास प्रोत्साहन मिळून कृषी उत्पादनात वाढ होण्यास मदत होणार आहे. बुलढाणा जिल्ह्यासाठी खरीप हंगामातील मुग, उडीद, सोयाबीन, तूर, मका, बाजरी, ज्वारी, भुईमूग व सूर्यफूल या पिकांचा स्पर्धेत समावेश करण्यात आला आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी शेतकऱ्याच्या स्वतःच्या नावावर जमीन असणे व ती स्वतः कसत असणे आवश्यक आहे. तसेच संबंधित पिकाखाली किमान ४० आर क्षेत्रावर सलग लागवड केलेली असावी. शेतकऱ्यांना एकाच वेळी एकापेक्षा अधिक पिकांसाठी स्पर्धेत सहभागी होता येणार आहे. स्पर्धेसाठी सर्वसाधारण गटातील शेतकऱ्यांना प्रति पीक ३०० रुपये तर आदिवासी गटातील शेतकऱ्यांना १५० रुपये प्रवेश शुल्क भरावे लागणार आहे. मुग व उडीद पिकांसाठी अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत ३१ जुलै २०२६ असून सोयाबीन, तूर, मका, ज्वारी, बाजरी, भुईमूग व सूर्यफूल पिकांसाठी ३१ ऑगस्ट २०२६ ही अंतिम तारीख आहे. स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांनी विहित नमुन्यातील अर्जासोबत प्रवेश शुल्क चलन, ७/१२ उतारा, ८-अ उतारा तसेच आदिवासी प्रवर्गातील असल्यास जात प्रमाणपत्र जोडून संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयात अर्ज सादर करावेत. प्राप्त अर्जांच्या आधारे संबंधित तालुका कृषी अधिकारी पिकस्पर्धा जाहीर करणार आहेत. स्पर्धेतील विजेत्यांना तालुका, जिल्हा आणि राज्य स्तरावर आकर्षक रोख पारितोषिके देण्यात येणार आहेत. तालुका स्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकासाठी अनुक्रमे ५ हजार, ३ हजार व २ हजार रुपये, जिल्हा स्तरावर १० हजार, ७ हजार व ५ हजार रुपये तर राज्य स्तरावर ५० हजार, ४० हजार व ३० हजार रुपयांची बक्षिसे देण्यात येणार आहेत. पिकस्पर्धेच्या सविस्तर मार्गदर्शक सूचना कृषी विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून अधिक माहितीसाठी संबंधित गावाचे सहाय्यक कृषी अधिकारी, कृषी पर्यवेक्षक किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. शेतकरी बांधवांनी मुदतीपूर्वी अर्ज सादर करून मोठ्या संख्येने पिकस्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे.




# जागतिक नेत्रदान दिनानिमित्त बुलढाण्यात नेत्रदान-जीवनदान जनजागृती मोहीम

जनसंचलन/बुलढाणा

जिल्हा अंधत्व नियंत्रण कार्यक्रम, जिल्हा रुग्णालय बुलढाणा, आरोग्य विभाग जिल्हा परिषद बुलढाणा आणि विदर्भ ऑप्थल्मोलॉजिकल सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक नेत्रदान दिनानिमित्त बुधवार, दि. १० जून २०२६ रोजी विशेष ङ्कनेत्रदान-जीवनदानफ जनजागृती मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम सकाळी ९ वाजता छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, संगम चौक, बुलढाणा येथे होणार असून समाजामध्ये नेत्रदानाबाबत जागरूकता निर्माण करणे आणि अधिकाधिक नागरिकांना नेत्रदानासाठी प्रेरित करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. कार्यक्रमास जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गीते, विदर्भ ऑप्थल्मोलॉजिकल सोसायटीचे अध्यक्ष डॉ. शोन चिंचोले, नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. जीवणे, डॉ. भिलावेकर, डॉ. तोडकर, समुपदेशक योगेश शिरसाट तसेच सौरभ हिवाळे आणि देवकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. नेत्रदानामुळे कॉर्नियल अंधत्व असलेल्या व्यक्तींना दृष्टी मिळण्याची संधी उपलब्ध होते. मृत्यूनंतर केलेले नेत्रदान अनेक अंध व्यक्तींच्या जीवनात प्रकाश निर्माण करून त्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत करते. वाढती गरज आणि उपलब्ध कॉर्नियांची मर्यादित संख्या यामधील दरी कमी करण्यासाठी जनसहभाग अत्यंत महत्त्वाचा असल्याचे आरोग्य विभागाने नमूद केले आहे. या -ॐमोहिमेअंतर्गत जनजागृती रॅली, सार्वजनिक शिक्षण कार्यक्रम, नेत्रदान प्रतिज्ञा मोहीम, पोस्टर प्रदर्शन तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून व्यापक जनजागृती करण्यात येणार आहे. डोळे दान करा दृष्टीची भेट द्या, आयुष्याला प्रकाश द्याङ्क हा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी आरोग्य विभाग कटिबद्ध असून जिल्ह्यातील नागरिकांनी या उदात्त कार्यात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गीते आणि जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार यांनी केले आहे.




# पद्म पुरस्कार २०२७ साठी नामांकन प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

जनसंचलन/बुलढाणा

भारत सरकारतर्फे प्रदान करण्यात येणारे पद्मविभूषण, पद्मभूषण आणि पद्मश्री हे देशातील सर्वोच्च नागरी सन्मानांपैकी मानाचे पुरस्कार आहेत. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय आणि समाजोपयोगी कार्य करणाऱ्या व्यक्तींचा गौरव या पुरस्कारांद्वारे केला जातो. प्रजासत्ताक दिन २०२७ निमित्त जाहीर होणाऱ्या पद्म पुरस्कारांसाठी राज्यातील पात्र व्यक्तींची नामांकने मागविण्यात आली आहेत. गृह मंत्रालय, भारत सरकार यांच्या वतीने दिल्या जाणाऱ्या या पुरस्कारांचा उद्देश विविध क्षेत्रांतील असामान्य योगदानाची दखल घेणे हा आहे. कला, साहित्य व शिक्षण, क्रीडा, वैद्यकीय क्षेत्र, समाजकार्य, विज्ञान व अभियांत्रिकी, नागरी सेवा, व्यापार व उद्योग आदी क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कार्य अथवा सेवेसाठी हे पुरस्कार प्रदान केले जातात. जिल्ह्यातील पात्र व्यक्तींची पद्म पुरस्कार २०२७ साठी नामांकने विहित नमुन्यात भरून दि. ३१ जुलै २०२६ पर्यंत ऑनलाइन सादर करावीत. नामांकन प्रस्ताव भारत सरकारच्या राष्ट्रीय पुरस्कार पोर्टलवर अपलोड करणे आवश्यक आहे. नामांकन प्रक्रियेबाबत अधिक माहिती तसेच ऑनलाइन अर्जासाठी राष्ट्रीय पुरस्कार पोर्टलला भेट द्यावी. जिल्ह्यातील विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींची नावे पुढे आणण्यासाठी नागरिक, संस्था आणि संघटनांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.



# विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्यासाठी अभ्यासिका महत्त्वाची राज्यमंत्री योगेश कदम

## मेहकर येथील अद्ययावत अभ्यासिकेचे लोकार्पण....

जनसंचलन/बुलढाणा

देशाच्या विकासात तरुणांचा मोठा वाटा असून त्यांचे उज्वल भविष्य घडविण्यासाठी आधुनिक सुविधा असलेल्या अभ्यासिका महत्त्वपूर्ण ठरतात. विद्यार्थ्यांनी अशा सुविधांचा लाभ घेऊन शिक्षण, स्पर्धा परीक्षा तसेच विविध क्षेत्रांत प्रगती साधत देशाच्या विकासात योगदान द्यावे, असे आवाहन राज्याचे गृह (शहरे), महसूल, ग्रामविकास व पंचायत राज तसेच अन्न व औषध प्रशासन राज्यमंत्री योगेश रामदास कदम यांनी केले. मेहकर शहरातील शिवाजीनगर परिसरात सुमारे ६ कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या अद्ययावत अभ्यासिकेचे लोकार्पण राज्यमंत्री कदम यांच्या हस्ते आज करण्यात आले. विद्यार्थ्यांना दर्जेदार व आधुनिक अभ्यासाच्या सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ही अभ्यासिका उभारण्यात आली आहे. लोकार्पण समारंभास केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव, आमदार किरण सरनाईक, सिद्धार्थ खरात, मेहकर नगरपालिकेचे अध्यक्ष किशोर गारोळे, उपविभागीय अधिकारी रवींद्र जोगी, माजी आमदार संजय रायमुलकर, अधिकारी-



कर्मचारी तसेच विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना राज्यमंत्री योगेश कदम म्हणाले की, ही अभ्यासिका स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विशेषतः उपयुक्त ठरणार आहे. मात्र विद्यार्थ्यांनी केवळ स्पर्धा परीक्षांपुरते मर्यादित न राहता विज्ञान, तंत्रज्ञान, संशोधन, उद्योजकता, कला, क्रीडा आदी विविध क्षेत्रांतही उत्साहाने सहभागी व्हावे. अभ्यासिकेमुळे ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी अनुकूल वातावरण उपलब्ध होणार आहे. अभ्यासिकेत विद्यार्थ्यांसाठी आधुनिक वाचन सुविधा, संदर्भग्रंथ, डिजिटल साधने यांसह ऑडिओ लायब्ररीची सुविधाही उपलब्ध करून देण्याचा विचार करण्यात यावा, अशी सूचनाही त्यांनी केली. यावेळी केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव म्हणाले की, मेहकर तालुक्यात विविध विकासकामे वेगाने सुरू असून त्यातून शहराचा सर्वांगीण विकास होत आहे. आधुनिक अभ्यासिकेमुळे शहराच्या वैभवात भर पडली असून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण अभ्यासासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध होणार आहेत. या अभ्यासिकेच्या माध्यमातून या भागातील तरुण उच्च पदांवर पोहोचतील आणि आपल्या शहराच्या तसेच देशाच्या विकासात मोलाचे योगदान देतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. अभ्यासिकेसाठी पुस्तके, संगणक तसेच अन्य आधुनिक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक सहकार्य करण्यात येईल, असे केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव व आमदार सिद्धार्थ खरात यांनी यावेळी सांगितले.


आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| अ.क्र. | गुंतवणूक कालावधी महिने | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | – |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | – |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा...
सुकन्या लक्षाधीश ठेव योजना



गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे
सुकन्या लक्षाधीश ठेव योजना
जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली
मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा
फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४


## क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले मुलींच्या शासकीय वसतिगृहात प्रवेश प्रक्रिया सुरू

जनसंचलन/बुलढाणा



सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले मुलींचे शासकीय वसतिगृह (नवीन व जुने), बुलढाणा येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. वसतिगृहातील प्रवेशासाठी प्रवर्गनिहाय आरक्षित टक्केवारीनुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील विद्यार्थिनी पात्र राहणार आहेत. शालेय शिक्षण, कनिष्ठ महाविद्यालय, वरिष्ठ महाविद्यालय तसेच व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींना प्रवेशासाठी अर्ज करता येणार आहे. प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थिनींनी ... या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज सादर करावेत. अर्ज करण्याची अंतिम मुदत दि. ३० जून २०२६ असून पात्र विद्यार्थिनींनी मुदतीपूर्वी अर्ज भरून या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन वसतिगृहाच्या गृहपाल यांनी केले आहे. शासकीय वसतिगृहांमुळे विद्यार्थिनींना सुरक्षित निवास, शैक्षणिक वातावरण आणि विविध शासकीय सुविधांचा लाभ मिळत असल्याने अधिकाधिक विद्यार्थिनींनी प्रवेश प्रक्रियेत सहभागी व्हावे, असेही आवाहन करण्यात आले आहे.